# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग
## कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर (का.)
## ता. शिरूर (का.) जी. बीड
## रा.से.यो. नियमित कार्यक्रम अहवाल २०१४-२०१५

कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग शै. वर्षे २००३-२००४ मध्ये स्थापन झाला. या विभागाच्या माध्यमातून शिरूर (का.) तालूक्यातील ग्रामीण परिसरातील समाज प्रगतीचे कार्य केले आहे. करत आहे. त्याचे मुर्त रूप आत्ता पहावयास मिळत आहे. शैक्षणिक प्रगतीबरोबरच स्वच्छता, अरोग्य, घनकचऱ्याचे व्यवस्थापन, कम्पोष्ट खत निर्मीती, महिला सक्षमीकरण आणि सबलीकरण, सिंचनाचे महत्व, पाणदमुक्ती, सांडपाण्याचे व्यवस्थापन इ. मुलभूत सोयीसाठी व समस्यावरील उपाययोजनेसाठी कालिकादेवी महाविद्यालय सतत कार्यरत आहे.

शिरूर (का.) परिसर हा उसतोड मजूरासाठी व स्त्रीभ्रुण हत्येसाठी विशेष गाजत आसला तरी या परिसरातून सैन्य भरती, व पोलिस भरती बरोबरच शासनाच्या विविध खात्यात कंपन्याच्या विविध पदावर या परिसरातील विद्यार्थी आता दिसू लागले आहेत. या प्रगतीमध्ये कालिकादेवी महाविद्यालयाचा शैक्षणिक प्रगतीचा वाटा मोठा आहे, हे कोणीही नाकारू शकणार नाही.

**प्रवेश प्रक्रिया :** रा.से.यो. विभागाकडे महाविद्यालयातील मुला मुलिंचा ओढा खुप मोठया प्रमाणात आहे. जुन जुलै मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेची प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर रा.से.यो. विभागात विद्यार्थ्याचे अर्ज दाखल होतात. शै. वर्षे २०१४-२०१५ या वर्षात जवळजवळ २३० अर्ज दाखल झाले. पैकी, विद्यापीठाने निर्धारीत केलेली विद्यार्थी संख्या २०० असल्याने २०० विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आली.

दि. ०१/०८/२००१४ रोजी महाविद्यालय परिसरात श्रमदान घेण्यात आले. त्यात कचरा, साफसफाई करण्यात आली. यानंतर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या प्रसंगी दै. लोकमतचे ता. प्रतिनिधी विजयकुमार

Scanned by CamScanner

गाडेकर यांचे व्याख्यान झाले. त्यांनी आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या कार्याचा आढावा घेतला. देशाच्या स्वातंत्र्यात या दोन महामनवाचे योगदान ऐतिहासिक आहे असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. अशोक घोळवे यांनी केले. तर आभार प्रा. व्ही.एस. जाधव यांनी मनले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना आल्पोपहार व चहा देण्यात आला.

दि. ०९/०८/२०१४ रोजी महाविद्यालयात क्रांती दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते इतिहास विभाग प्रमुख प्रा .विठ्ठल गुंडे होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. संजय सावते यांनी केले तर आभार प्रा. डॉ. अशोक घोळवे यांनी मानले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना आल्पोपहार देण्यात आले.

१५/०८/२०१४ रोजी महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी ध्वजारोहन प्रभारी प्राचार्य डॉ. एस.के. तुपे यांच्या हस्ते करण्यात आले.

गावात प्रभातफेरी काढण्यात आाली. विद्यर्थ्यांनी महात्मा गांधी की जय, स्वातंत्र्यदिनाचा विजय असो अशा घोषना दिल्या. या प्रसंगी विद्यार्थ्यांना आल्पोपहार देण्यात आला.

दि. २३/०८/२०१४ रोजी विद्यापीठ वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयात उच्च शिक्षण काल आज आणि उद्या या विषयावर प्रा. डॉ. चेतना डोंगळीकर, प्रा. डॉ. शाम सानप यांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. एस.के. तुपे हे होते.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. अशोक घोळवे यांनी केले तर आभार प्रा. राम गांगर्डे यांनी मानले.

या प्रसंगी महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहिम राबवण्यात आली. वृक्ष रोपनही करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना आल्पोहार देण्यात आला.

दि. १७/०९/२०१४ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी विकास प्रक्रियेत मराठवाडा या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रा. व्ही.एस.जाधव, प्रा. बंडू पवार यांनी आपले अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. उध्दव चौधर यांनी केले तर आभार सौ. सय्यद अफरोज यांनी मानले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना आल्पोहार देण्यात आला.

Scanned by CamScanner

दि. ०४/०१/२०१५ रोजी महाविद्यालयात गांधी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. श्रमदान घेण्यात आले. गावातील रस्ता साफ करण्यात आला. या वेळी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. बंडू पवार, डॉ. अशोक घोळवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी स्वंयसेवकांना आल्पोपहार देण्यात आला.

दि. १४/०१/२०१५ हा दिवस बालदिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी स्वंयसेवकांनी बालकांना स्वच्छतेचे धडे दिले.

दि. १०/१२/२०१४ रोजी महाविद्यालयात संस्थेचे सचिव मा. आ. जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त वकृत्व व वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

दि. ०३/ जानेवारी २०१५ रोजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत स्त्री आत्याचार विरोधी रॅलिचे आयोजन करण्यात आले होते. ही भव्य रॅली शिरूर कासारच्या इतिहासात सर्वात मोठी ठरली. या वेळी महिला मुक्तीदिनानिमीत्त स्त्रिया वरील अन्यायावर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने यांनी प्रकाश टाकला. सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आढावा त्यांनी घेतला. या कार्यक्रमाचे नियोजन आणि सुत्रसंचलन कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक घोळवे यांनी केले तर आभार प्रा. व्ही.एस.जाधव यांनी मानले.

दि. १२/०१/२०१५ रोजी महाविद्यालयात स्व.केशरबाई क्षीरसागर यांच्या स्मृतिदिनानिमित्त राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्‌घाटन बीड नगरपरिषदेच्या माजी. नगराध्यक्षा प्राचार्य डॉ. दिपाताई क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे डॉ. राजेश मचाले होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. अशोक घोळवे यांनी केले तर आभार डॉ. सुधीर येवले यांनी मानले. डॉ. म.द.क्षीरसागर, डॉ. एन.डी.चौधरी व प्रा. कटारे यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.

या कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांनी केले होते.

दि. २६ जानेवारी २०१५ रोजी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

दि. ०५/०२/२०१५ ते दि. १२/०२/२०१५ या कालावधीत रा.से.यो.चे विशेष शिबीर मौजे दहिवंडी या गावात घेण्यात आले. त्याचा स्वतंत्र अहवाल सोबत जोडला आहे.

Scanned by CamScanner

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग.
## कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर (का.)
## ता. शिरूर (का.) जी. बीड
## रा.से.यो. विशेष शिबीर अहवाल २०१४-२०१५

कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे रा.से.यो शिबीर मौजे दहिवंडी ता. शिरूर (का.) जि. बीड येथे अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले.

दि. ०६/०२/२०१५ रोजी सकाळी ठिक ९.३० वाजता शिबीराचे उद्घाटन तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बी.एस.सुर्यवंशी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने होत्या तर प्रमुख उपस्थिती सरपंच शिला आघाव, उपसरपंच युवराज कठाळे, ग्रामसेवक ए.व्ही. सानप, यांच्यासह ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी उद्घाटक म्हणून मा. बी.एस. सुर्यवंशी बोलतांना म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना ही जगायला शिकवते देशाबद्दल, राष्ट्राबद्दल,समाजाबद्दल आदरभाव वाढवून आपण दूसऱ्यासाठी काहीतरी केल पाहिजे ही भावना जोपासली पाहिजे. बेटी बचाव बेटी पढाव असा संदेशही दिला पाणलोट, शासनाच्या विविध योजना, राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील गरजू पर्यंत पोहचाव्यात असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने म्हणाल्याकी,माणूस घडवण्याचे रा.से.यो. एक माध्यम आहे. या शिबीरात पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून राहिलेल्या स्वंयसेवकांना जगण्यासाठी दुसऱ्यासमोर हाथ पसरवयाची वेळ येत नाही. म्हणून रा.से.यो. हे देशाच्या दृष्टीने कुरूक्षेत्र आहे. या प्रसंगी सौ. शिला आघाव यांनी सर्वोत्परी मदत आणि सहकार्य करण्याची तयारी बोलून दाखवली. तर युवराज कठांळे यांनी सांगितले की, ग्रामस्थ व मी स्वत: या शिबीरात विद्यार्थी म्हणून कार्यरत राहिल, असेही म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक घोळवे यांनी केले. सुत्रसंचलन प्रा. संजय सावते यांनी केले तर आभार प्रा. राम गांगर्डे यांनी मानले. मा. बी.एस.सुंर्यवंशी यांच्या हस्ते माती बंधाऱ्याचे भूमीपूजन झाले.

Scanned by CamScanner

दि. ०७/०२/२०१५ रोजी सकाळी स्वयंसेवकांनी गावात प्रभातफेरी काढली. रस्तयावर पडलेला कचरा गोळा केला. व रस्त्याच्या कडेला पडलेला कचरा एका खडयात टाकला. व त्या खडयात सांडपाणी सोडले. परिणामी काही दिवसानंतर त्यचे कंपोष्ट खत तयार होईल. श्रमदान झाल्यानंतर स्वंयसेवकांनी आंघोळ, जेवन उरकल्यानंतर दुपारच्या कार्यक्रमाची तयारी केली.

या प्रसंगी प्रा. जी.एन. येडे यांनी राष्ट्रीय एकात्मतेत युवकांची भुमिका या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. या प्रसंगी अध्यक्ष प्रा. संजय सावते होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन स्वंयसेवक अशोक केदार याने केले. प्रस्ताविक कु. सना शेख हिने केले तर आभार अनिकेत औसरमल यांने मानले.

रात्री स्वंयसेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रम केला. यात हागणदारी मुक्ती, पाण्याचे संवर्धन आपल्या संस्कृतीक कार्यक्रमातून, नाटयाच्या माध्यमातून पटवून दिले.

दि. ०८/०१/२०१५ पासून स्वंयसेवकांनी शाळेच्या बाजूला विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून हातपंप घेतलेला आहे. त्याच्या बाजूलाच एक ओडा वाहात आहे. त्या ओढयावर स्वंयसेवकांनी श्रमदानातून मातीबंधारा तलावाचे लहान रूप तयार करण्यास सूरूवात केली.

या कामी कृषी सहाय्यक ए.जे. चव्हाण,पी.बी.जिडके यांनी मार्गदर्शन केले. व स्वयंसेवकांना माती बंधाऱ्याचे प्रात्यक्षीक दाखवले. या प्रसंगी त्यांनी स्वंयसेवकांना जलयुक्त शिवार अभियानात पाणलोटाचे महत्व विषद केल. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. रमेश लाहोटी होते. सुत्रसंचलन कु.पुष्पा पुरी हीने केले आभार रामसिंग गडदे यांनी मानले.

रात्री शिरूर तालुक्यातील निमंत्रित कवींचे संमेलन झाले. त्यात अध्यक्ष विठ्ठल जाधव, रा.ज. कातखडे, अनंत कराड, संजय डोरले इ. कवींनी आपल्या कविता सादर केल्या या प्रसंगी ग्रामस्थ महिला पुरूषांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती.

दि. ०९/०२/२०१५ रोजी डॉ.पंडित मुळे यांनी जल संवर्धन पाण्याचे महत्व व कृषी अर्थशास्त्रावर अभ्यासपुंर्ण मत मांडले. जर जून पासून शेतकऱ्यांनी आपल्या शेतीचे आर्थिक आंदाजपत्रक तयार केले व त्यानुसार शेतीत खर्च केला तर शेती तोटयात जात नाही. तीन महिन्यात पैसे डबल होण्याची देशात एकही बँक नाही. पण या बँकेचा मालकच आज आत्महात्या करतो आहे ही चिंता त्यंनी व्यक्त केली.

Scanned by CamScanner

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कोमल आघाव हिने केले तर आभार धनंजय डोळस याने मानले.

दि. १०/०२/२०१५ रोजी जलसंवर्धनात युवकांची भुमिका या विषयावर डॉ. मधुकर क्षीरसागर यांचे व्याख्यान झाले. पाणी जमीन हवा हया निमसर्गाने मानवाच्या सोईसाठी दिल्या आहेत. त्यचे संवर्धन करण्याचे सोडून मानव या बाबींना बदल करूण ऱ्हास करण्यांसाठी स्पर्धा करतो आहे. या बाबींची संवर्धनाची जबाबदारी रा.से.यो. च्या स्वंयसेकांची आहे. आसे ते आपाल्या व्याख्यानातून म्हणाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. व्ही. एस. जाधव होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक मोनिका नागरगोजे हिने केले. सुत्रसंचलन सचिन पालवे याने केले तर आभार पुनम औसरमल हिने मानले.

दि. ११/०२/२०१५ रोजी डॉ. प्रिती बडे, डॉ. सुष्मा सानप यांनी शिबीरातील स्वंयसेवक मुलींची अरोग्य तपासणी केली. तेव्हा. धक्कादायक बाब समोर आली की, मुलीमध्ये हेमोग्लोबिनचे प्रमाण कमी आहे. हे आरोग्यास हानिकारक आहे.म्हणून यावर उपायही सुचवले

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. चेतना डोंगळीकर यांनी भुषवले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रिती मुळे हिने केले तर आभार कोमल कांबळे हिने मानले.

या शिबीराचा समारोप डॉ. एम.एस.हेरकर, ह.भ.प.त्रिविक्रमांनद शास्त्री महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.पी.बी. देशमाने होत्या.

Scanned by CamScanner

**रा.से.यो. च्या शिबीरात झालेली समाजउपयोगी कामे.**

**१) माती बंधारा**

गावाच्या कडेवरून ओढा वहात होता या वढयावर स्वयंसेवकांनी श्रमदानातून माती बंधाऱ्याचे काम पुर्ण केले. परीणामी हातपंपाची पाणीपातळी उचांवेल व पाणी टंचाई भासणार नाही.

**२) परिसर स्वच्छता**

स्वंयसेवकांनी गावात प्रभातफेरी काढून स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने यांनी हातात झाडू घेऊन शाळेसमोरील अंगण साफ केले. त्यातून स्वंयसेवकाबरोबर ग्रामस्थानींही प्रेरणा घेतली.

**३) सांडपाण्याची व्यवस्था**

गावात मोठया प्रमाणात रस्तयावर सोडून दिले जात होते. स्वंयसेवकांनी दोन तिन घरामध्ये एक असा श्वस खड्डा खोदून पाणी तिथेच मुरविल्याने रस्त्यावरील घान कमी झाली. व भविष्यात होणाऱ्या साथीच्या आजारांना आळा बसेल.

**४) विविध विषयावरील अभ्यासपुर्ण व्याख्याने**

शिबीर काळात विविध विषयावरील व्याख्यानामुळे ग्रामस्थ व स्वयंसेवकांना बौध्दिक मेजवानीही मिळाली.

कार्यक्रमाधिकारी

प्राचार्य

Scanned by CamScanner